८-१ (६)

पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, पुणे ५.
मुख्य अग्निशामक अधिकारी यांचे कार्यालय,
सेंट्रल फायर स्टेशन, महात्मा फुले पेठ, पुणे
जावक क्र.अशाद/ २१९६
दिनांक:- २९/०७/२०२४

मा. प्राचार्य,
केंद्रीय विद्यालय नं. २ ,
लोहगाव, पुणे

विषय:- केंद्रीय विद्यालय नंबर २ ए एफ एस, पुणे करिता अग्निसुरक्षा प्रमाणपत्र मिळणेबाबत

संदर्भ :- १. इकडील ना हरकत दाखला जा.क्र. एफबी/५८९३, दि.२७/०३/२०२३.
२. आपला पत्र इकडील आवक क्र. ४१९७ , दिनांक १८/०७/२०२४.

महोदय,

उपरोक्त विषयांकित ठिकाणच्या तळ मजला + एक मजली शैक्षणिक इमारतीसाठी अग्निशमन दलाने यापूर्वी संदर्भ क्रं.१ अन्वये ना हरकत दाखला दिलेला होता. सदर इमारतीची स्थायी व अस्थायी स्वरुपाची अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत असल्याबाबत मे. श्री गणेश फायर अॅन्ड सेफ्टी सर्व्हिसेस,पुणे यांनी सादर केलेल्या फॉर्म "बी" नुसार सदर ठिकाणी असणारी अग्निशमन यंत्रणा कार्यन्वित व सुस्थितीत असल्याचे दिसून येते.

तरी उपरोक्त संदर्भ क्र.२ चे पत्रास अनुसरून या पत्राद्वारे अग्निशमन दलाने विषयांकित ठिकाणच्या शैक्षणिक इमारतीकरिता संदर्भ क्रं.१ अन्वये दिलेल्या ना हरकत दाखल्याचे नुतनीकरण आपल्या मागणीवरून करण्यात येत असून, सदरील ना हरकत दाखला जानेवारी, जुलै मध्ये फॉर्म 'बी' प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर एक वर्षासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

कळावे.

(सुभाष प्र. जोधव)
स्टेशन ड्युटी ऑफिसर
अग्निशमन दल, पुणे महानगरपालिका

CamScanner